पुण्य नगरी

# 'रवळनाथ'ने निर्माण केला सहकार क्षेत्रात आदर्श

## बाळासाहेब काकतकर; रवळनाथ संस्थेस मराठा बँकेच्या संचालक मंडळाची सदिच्छा भेट

**गडहिंग्लज : प्रतिनिधी**

ग्राहकांना सर्वोत्तम सेवा आणि सामाजिक बांधिलकीच्या माध्यमातून 'रवळनाथ'ने आपुलकी निर्माण केली आहे. संस्थेने महाराष्ट्र, कर्नाटक राज्यात शाखा विस्तार व प्रगती केली आहे. सहकार, वित्तीय क्षेत्रासह शैक्षणिक क्षेत्रात देखील ही संस्था योगदान देत आहे. त्यामुळेच 'रवळनाथ'च्या कार्याचा सहकार क्षेत्रात आदर्श निर्माण झाला आहे. त्याचे अनुकरण करायला हवे, असे गौरवोद्गार बेळगाव येथील मराठा को-ऑप. बँक लि., संस्थेचे व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष बाळासाहेब काकतकर यांनी काढले.



गडहिंग्लज : रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटी सदिच्छा भेटीप्रसंगी मराठा बँकेचे पदाधिकारी व संचालक यांच्यासमवेत एम. एल. चौगुले व मान्यवर.

रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीच्या येथील प्रधान कार्यालयाच्या सदिच्छा भेटीप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले होते.

यावेळी काकतकर यांनी, 'रवळनाथ'च्या विभागांना भेटी देऊन संस्थेची कार्यप्रणाली जाणून घेतली. तसेच ज्ञानदीप प्रबोधिनी संचालित झेप ॲकॅडमीस भेट दिली. 'रवळनाथ'ची कार्यप्रणाली आणि अल्पावधीत केलेली उत्तुंग प्रगती पाहून मराठा बँकेचे संचालक भारावून गेले. संस्थापक चौगुले यांनी संस्थेच्या कार्याविषयी माहिती दिली. डी. के. मायदेव यांनी स्वागत केले.

यावेळी मराठा बँकेचे उपाध्यक्ष विश्वनाथ हंडे, संचालक लक्ष्मणराव होनगेकर, दिगंबर पवार, विनोद हंगीरकर, मोहन चौगुले, मोहन बेळगुंदकर, विनायक होनगेकर, विश्वजित हसबे, अशोक कांबळे, लक्ष्मण नाईक, बी. बी. खंडागळे, शिवकुमार शहापूरकर, जयराज मोदगेकर, 'रवळनाथ'च्या उपाध्यक्षा मीना रिंगणे, आनंद मेणसे यांच्यासह व्यवस्थापक, 'रवळनाथ'चे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. आर. एस. निळपणकर यांनी आभार मानले.